(३)

दि.२३/०९/२०२५

विषय :- आरोग्य विभाग, जिल्हा परिषद ,जळगांव

(आरोग्य विभाग, जिल्हा परिषद जळगांव येथे) प्रशिक्षणार्थी / आढावा बैठका करीता चहा, जेवण व नाष्टा पुरवठा करणेसाठी स्थानिक नोंदणीकृत स्थानिक अधिकृत भोजन पुरवठादार यांचे कडुन ई-दरपत्रक मागविणेत येत आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद जळगांव यांचेमार्फत

कामाचे नांव सन २०२५ -२६ करीता प्रशिक्षणार्थींना / आढावा बैठका करिता चहा,नाष्टा,जेवण,पिण्याचे शुध्द पाणी पुरविणे बाबत.

संदर्भ - मा.मु.का.अधिकारी जिल्हा परिषद,जळगांव यांची मंजुर टिपणी दि.१८/०९/२०२५ नुसार.

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद जळगांव करीता सन.२०२५-२६ या कालावधीत आढावा बैठकी साठी व प्रशिक्षणार्थींना भोजन पुरविणेसाठी स्थानिक स्थानिक पुरवठादार यांचेकडुन चहा,नाष्टा,जेवण,पिण्याचे शुध्द पाणी पुरवठा करणे करीता संबंधिताकडुन दरपत्रक कार्यालय पोहोच ई -दरपत्रके प्रसिध्द झालेच्या दिनांपासुन ५ दिवसांच्या आत सिलबंद पाकिटात आरोग्य विभाग, जिल्हा परिषद ,जळगांव पत्ता-(नविन जि.प.इमारत मजला,जळगांव येथे) कार्यालयीन वेळेत स.११.०० ते दु.४.०० या वेळेत (शासकिय सुटीचे दिवस वगळुन) मागविण्यात येत आहेत.

**दरपत्रकाच्या अटी व शर्ती**

**ई-दरपत्रके सोबत खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.**

1) आयकर (आय.टी.सी.सी.) INCOME TAX CLEARANCE मागिल ३ वर्षचा ITR Copy
२) GST मागिल ३ वर्षचा
३) GST नोंदणी प्रमाणपत्र
४) शॉप अॅक्ट किंवा संस्था नोंदणी प्रमाणपत्र पॅन कार्ड (संस्थेचे किंवा मालकाचे) असल्यास रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची प्रत आवश्यक.
५) समान दर आल्यास अनुभवास प्राधान्य देण्यात येईल.
६) बंधपत्र रु.१०० च्या स्टॅम्प पेपर
७) पॅन कार्ड
८) अन्न व औषध प्रशासन विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र दि.३१/०३/२०२५ अखेर अद्यावत.
९)पुरवठा आदेश मिळाल्यापासुन दिलेल्या मुदतीत जि.प. जळगांव येथे स्वखर्चाने पोहोच करावे लागेल.

## नियमीत जेवण

| अ.नं. | बाब | पदार्थाचे नांव |
|---|---|---|
| १ | स्पे.चहा/कॉफी, | १. चहा/कॉफी १ कप सकाळी व १ कप दुपारी |
| २ | नाष्टा १५० ग्रॅम १ प्लेट | १) पोहे - १ प्लेट (सोबत मटकी रस्सा) |
| | | २) खमंग ढोकळा १ प्लेट (सोबत खटई) |
| | | ३) मेदुवडा सांबर - २ नग |
| | | ४) उत्तप्पा सोबत चटणी व सांबार |
| | | ५) मसाला डोसा (सोबत चटणी) |

| | | |
|---|---|---|
| | | ६) इडली चटणी सांबार - ३ इडली व १ वाटी चटणी/सांबार |
| | | ७) कचोरी,समोसा,वडापाव, प्रत्येकी २ नग |
| | | ८) मिसळ (मटकी,मुग,चवळी,हरभर) या पैकी . |
| | | ९)पराठा प्रत्येकी २ नग (आलु/पालक/भोपळा/मेथी) सोबत चटणी |
| | | १०) साबुदाना खिचडी - १ प्लेट व दोन केळी |
| ३ | दुपारचे जेवण शाकाहारी पोटभर (प्रती ताट दर) | चपाती भात, वरण, दोन भाज्य (एक रस्सा भाजी, एक सुकी भाजी) कोशिंबिर, लोणचे, पापड, कांदा,लिंबु स्विट डिश १०० ग्रॅम (गुलाबजाम,मावा बर्फी,श्रीखंड,शिरा,बासुंदी,जिलेबी या पैकी एक) |

१) वर नमुद केल्याप्रमाणेच सर्व पदार्थ दुपारच्या व रात्रीच्या जेवणात देणे बंधनकारक आहे. अन्यथा आपली ई- दरपत्रक रद्द करण्यात येईल.तसेच एका प्रशिक्षण सत्राला एकाच प्रकारचे पदार्थ वारंवार देता येणार नाही व प्रत्येक प्रशिक्षण सत्रास पिण्याचे शुध्द पाणी पुरविण्याची जबाबदारी संबंधीत पुरवठा धारक यांची राहील.

२) ई- दरपत्रक स्विकारल्याच्या दिनांकापासुन ८ दिवासांच्या आत करार पत्र रु.१००/- स्टॅम्प पेपर करावे लागेल. तसेच नियमाप्रमाणे पुरवठा करावयाच्या किंमतीच्या ५ टक्के अनामत रक्कम रु. १५,०००/- सुरक्षा ठेव (विना व्याज मुदत ठेव पावती स्वरुपात) म्हणनु आरोग्य अधिकारी ,जिल्हा परिषद, जळगांव यांचे नावे मुदत ठेव पावती कार्यालयास जमा करावी लागेल.

ई- दरपत्रक स्विकारल्यानंतर चहा, जेवण, व नाष्टा सुरु करण्याचे आदेश प्राप्त झाल्यापासुन मागणी नुसार आरोग्य विभाग, जिल्हा परिषद ,एनएचएम विभाग, जिल्हा परिषद मध्ये होणा-या आढावा सभा येथे ठरलेल्या दराप्रमाणेच स्वखर्चाने पुरवठा करावा लागेल.

३) कोणतेही कारण न दाखविता ई-दरपत्रक स्विकारण्याचा व नाकारण्याचा हक्क या कार्यालयाने राखुन ठेवला आहे.ई-दरपत्रक धारकांचे पदार्थ दर सर्व करासह नमुद करावे.मंजुर दरातील बिलामध्ये शासकिय नियमानुसार कर कपात करण्यात येईल. तसेच सर्व पदार्थांचे दर भरणे आवश्यक आहे.

४) जेवण,चहा,नाष्टा सुरु झाल्यावर काही तांत्रिक बाबी किंवा जेवण विषयी तक्रार प्राप्त झाल्यास जेवण चहा,नाष्टा बंद करण्याचे अधिकारी या कार्यालयास राहील.

५) दरपत्रका मध्ये दिलेले पदार्थाखेरीज इतर कोणतेही पदार्थ ठेवता येणार नाही.

६) प्रत्येक प्रमाणपत्रावर निविदा धारकांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

७) चहा,नाष्टा व जेवण ट्रेनिंगच्या / आढावा बैठकीच्या ठिकाणी मागणी प्रमाणे जागेवर मंजुर दराप्रमाणे स्वखर्चाने पोहोच करावे लागेल.

८) संस्थेने / पुरवठादाराने पुरविलेल्या खाद्य पदार्थांची अन्न व औषध प्रशासन विभागाकडुन वेळोवेळी आवश्यकतेनुसार तपासणी केली जाईल.

९) जर पुरवठा धारकाने विहित कालावधीत चहा,नाष्टा व जेवणाचा पुरवठा केला नाही तर पुढील कार्यवाहीस पात्र राहील.

(5)

पुरवठा केलेले अन्नपदार्थ अस्विकृत झाल्यास त्याचे देयक अदा केले जाणार नाही. तरी मु.का. अ.जिल्हा परिषद जळगांव त्यांना योग्य वाटेल अशा दराने उर्वरित अन्नपदार्थ खरेदी करणेस सक्षम राहतील व सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल.

११) जेव्हा अनु क्रमांक ९ व १० मध्ये नमुद केलेली कार्यवाही अंमलात आणली जाईल तेव्हा अ) अशा कसुरदार पुरवठाधारकाची पुरवठा करण्याची तयारी विचारात घेतली जाणार नाही.ब) कसुरदार पुरवठाधारकांस दोन्ही दरामधील किमतीचा फरक अथवा १० टक्के या दोन्ही पैकी जी रक्कम जास्त असेल तेवढया रकमेचा दंड करण्यात येईल. क) जर कसुरदार पुरवठा धारकाने दंड रकमेचा भरणा केला नाही तर त्याची अनामत रक्कम जप्त करुन त्याचे नांव काळया यादीत समाविष्ठ करण्यात येईल.

१२) पुरवठा धारकांस देय असलेल्या रकमेमधुन नियमानुसार आयकर/विक्रीकराची वसुली करण्याचे जे दर विहित केलेले असतील त्यानुसार वसुली केली जाईल.

१३) पुरवठा केलेल्या अन्नपदार्थाची मंजुर कलेल्या दराप्रमाणे देयक सादर करावयाचे आहे.या ई-दरपत्रकातील अटी व शर्ती याबाबत कोणत्याही प्रकारचे वाद झाल्यास मा.अध्यक्ष जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी तथा मा. मु.का.अधि.यांचा निर्णय अंतिम राहील.

टीपः- दोन वेळेस जेवण, एक वेळेस नाष्टा व दोन वेळेस चहा व पिण्याचे शुध्द पाणी यांचे एकत्रित अंदाजित दर विविध प्रशिक्षणासाठी वरिष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शक सुचनेनुसार नियमित जेवण पुरविते वेळी रु.२०० /- इतके राहील.

District Health Officer
Zilla Parishad, Jalgaon

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद जळगाव